<u>अतारांकित प्रश्नोत्तरांची विसावी यादी</u>

# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**उजनी धरणातून भीमा नदी व डाव्या कालव्यात सोडल्या जाणा-या पाण्याच्या गळतीबाबत**

**(१) ९५५२ (०७-०४-२०१५). श्री. नारायण पाटील (करमाळा), श्री. विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उजनी धरणातून भीमा नदी व डाव्या कालव्यात दिनांक २९ जानेवारी, २०१५ पासून दररोज एकूण ३२०० क्युसेस पाणी सोडले जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डाव्या कालव्यामध्ये पाण्याची गळती होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पाण्याच्या गळतीमुळे पाण्याचा वेग कमी होऊन त्याचा परिणाम जादा पाणी सोडण्यावर होत आहे, हे खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५) :** (१) नाही.

रब्बी आवर्तन क्र.२ करिता दि. २३/१/२०१५ पासून भीमा नदीत ७००० क्युसेक्स व डाव्या कालव्यामध्ये २२०० क्युसेक्स इतक्या विसर्गाने पाणी सोडल जात होते.

(२) होय.

(३) अंशत: खरे आहे.

पाण्याच्या गळतीमुळे पाण्याचा वेग कमी होत असून लागणाऱ्या पाण्याच्या परिमाणात वाढ होते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यास होत असलेल्या रॉकेलच्या अपुऱ्या पुरवठयाबाबत**

**(२) ९५५९ (०७-०४-२०१५). श्री. नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यासाठी तीन महिन्याकरीता ६ हजार ३०० किलो लिटर केरोसीनची मागणी केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या ३४ टक्केच रॉकेल प्रत्येक तालुक्यास दिले जाते, तसेच करमाळा तालुक्यास रॉकेलचा अपुरा पुरवठा होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने आवश्यक त्या कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०८-०५-२०१५) :**(१) व (२) सोलापूर जिल्हयांची केरोसिनची मागणी दरमहा ६३३६ कि.ली. इतकी आहे. माहे जानेवारी ते मार्च, २०१५ या तिमाहीकरिता सोलापूर जिल्हयास एकूण ५४३६ कि.ली. इतके म्हणजेच मागणीच्या २८.६० टक्के इतके केरोसिन नियतन उपलब्ध करुन देण्यात आले होते. या प्रमाणातच सोलापूर जिल्हयातील करमाळासह सर्व तालुक्यास नियतन मंजूर करण्यात आले आहे.
(३) केंद्र शासनाकडून राज्याच्या आवश्यकतेच्या २८ टक्के इतके केरोसिन नियतन प्राप्त होत आहे. राज्याच्या केरोसिन कोट्यात वाढ करण्याबाबत केंद्र शासनाकडे मागणी करण्यात आली असून, त्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद येथील जिल्हा नियोजन अधिकारी यांनी स्थानिक विकास निधी प्रशासकीय मान्यता व निधी वितरणात केलेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(३) ९५६५ (०७-०४-२०१५). श्री. हर्षवर्धन जाधव (कन्नड) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद येथील जिल्हा नियोजन अधिकारी श्री.हेमंत अहिरे यांनी स्थानिक विकास निधी प्रशासकीय मान्यता व निधी वितरणात केलेल्या गैरव्यवहाराबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ डिसेंबर, २०१४ च्या पत्राद्वारे मा.मंत्री, वित्त व नियोजन यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सदर तक्रारीबाबत शासनाने काय कारवाई केली
(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०५-२०१५) :**(१) सदर विषयाबाबतचे दि. १६ डिसेंबर, २०१४ रोजीचे पत्र आढळून आले नाही. तथापि त्याच आशयाचे दि. ९ डिसेंबर, २०१४ रोजीचे पत्र शासनास प्राप्त झालेले आहे.
(२) यासंदर्भात जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी केलेल्या नमुना पडताळणीअंती कळविल्यानुसार श्री.अहिरे, जिल्हा नियोजन अधिकारी यांनी सन २०१४-१५ मध्ये अंतिम अनुदानाच्या तुलनेत संपूर्ण निधी कार्यान्वयन यंत्रणांना वितरित केल्याचा व निधीचा गैरवापर झाला नाही असा केलेला खुलासा सकृतदर्शनी संयुक्तीक वाटत असल्याचे नमूद केले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कन्नड मतदारसंघात वन विभाग प्रादेशिक व वन्यजीव विभागामार्फत निकृष्ट दर्जाची कामे करण्यात आल्याबाबत**

**(४) ९५७१ (०७-०४-२०१५). श्री. हर्षवर्धन जाधव (कन्नड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कन्नड मतदारसंघात वन विभाग प्रादेशिक व वन्यजीव विभागा मार्फत निकृष्ट दर्जाची कामे करुन कोट्यावधी रुपयांची देयके अदा केल्या प्रकरणी मा.वने मंत्री यांचेकडे दिनांक १६ डिसेंबर, २०१४ च्या पत्राद्वारे मा.लोकप्रतिनिधींनी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली,

(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५) :**(१) वन्यजीव विभागाच्या कामासंदर्भात मा.मंत्री (वने) यांच्याकडे तर प्रादेशिक विभागाच्या कामासंदर्भात मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद यांच्याकडे तक्रार केली आहे.

(२) प्रादेशिक व वन्यजीव औरंगावाद विभागात केलेली कामे निकृष्ट दर्जाचे करुन कोट्यावधी रुपयांची देयके अदा करण्यात आली असल्याबाबत श्री.हर्षवर्धन रायभान जावध, वि.स.स. यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने वन्याजीव औरंगाबाद विभागातील केलेल्या कामाची सहाय्यक वनसंरक्षक (वन्यजीव), कन्नड व प्रादेशिक, औरंगाबाद विभागातील केलेल्या कामांची सहाय्यक वनसंरक्षक कन्नड, औरंगाबाद वन विभाग यांनी चौकशी केली असता सदर कामे चांगल्या प्रतीची, मापदंडाप्रमाणे व अंदाजपत्रकाप्रमाणे बरोबर असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठावाडा विकास मंडळाबाबत**

**(५) ९५७८ (०७-०४-२०१५). श्री. हर्षवर्धन जाधव (कन्नड) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठावाडा विकास मंडळास राज्य शासनाने विकास कामासाठी १०० कोटी रुपयांचा निधी मंजुर केला आहे, हे खरे आहे का,

(२) असल्यास, सदर निधी वितरणाबाबत शासनाने काय कार्यवाही केला आहे,

(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-०५-२०१५) :**(१) व (२) दिनांक ०४ ऑगस्ट, २०१४ शासन निर्णयान्वये मराठवाडा विकास मंडळास रु.१०० कोटी इतका विशेष निधी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरिता उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला होता व उपलब्धतेनुसार मराठवाडा विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रांतील जिल्ह्यांना रु.१३.९९ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

(३) उपलब्ध निधी वितरीत केला असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

---

## बॉम्बे उच्च न्यायालयाचे नाव मुंबई करण्याबाबत

**(६) ९५८६ (०६-०४-२०१५). श्री. गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९९५ अगर त्या सुमारास बॉम्बे शहराचे नाव बदलून मुंबई असे करण्यात आले असून महाराष्ट्र शासनाने बॉम्बे उच्च न्यायालयाचे नाव बदलून मुंबई असे नामकरण करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविला आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने सदर बाबतीत कायद्यामध्ये दुरूस्ती करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) याबाबतीत विलंब होत असल्याकारणाने राज्य शासन केंद्र शासनाकडे पाठपुरावा करणार आहे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०४-२०१५) :**(१) होय. महाराष्ट्र शासनाने दिनांक १७.१.२००५ रोजीच्या पत्रान्वये उच्च न्यायालय बॉम्बे याचे नामांतर करुन उच्च न्यायालय मुंबई करणेबाबत ना हरकत कळविली आहे.

(२) सचिव (न्याय), विधि व न्याय मंत्रालय, भारत सरकार यांनी दिनांक २७.८.२०१२ रोजीच्या पत्रान्वये मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना असे कळविले आहे की, कायद्याची योग्य प्रक्रिया पार पडल्यानंतर बॉम्बे, कलकत्ता आणि मद्रास येथील उच्च न्यायालयाचे नामांतर करण्यासाठी त्यांच्या विभागाकडून एकत्रित वैधानिक प्रस्ताव मांडण्यात येईल. यासंदर्भात राज्य शासनाकडून पाठपुरावा करण्यात येत आहे. तथापि, या प्रकरणी कार्यवाही केंद्र शासनाकडून प्रलंबित असल्याबाबतची माहिती केंद्र शासनाने दिनांक १.४.२०१५ च्या पत्रान्वये कळविली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सन २०१४-१५ मधील ऊस हंगामातील उस खरेदी कर माफ करण्याच्या निर्णयाबाबत

**(७) ९५९१ (१०-०४-२०१५). श्री. गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सन २०१४-१५ मधील उस हंगामातील उसाचा खरेदी कर माफ करण्याच्या शासनाने दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निर्णय घेतला आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाचा फायदा ऊस उत्पादक शेतक-यांना मिळावा त्यासाठी शासनाने साखर कारखान्यांवर कोणत्या अटी घातल्या आहेत,

(३) सन २०१४-१५ च्या ऊस गळीत हगामामध्ये किती रकमेचा कर साखर कारखान्यांना माफ केला आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०५-२०१५) :** (१) होय.

(२) साखर कारखान्याने शेतकऱ्यास उस खरेदी संदर्भात रास्त व किफायतशीर दर देण्यास शक्य व्हावे या करीता उसाचा खरेदी कर माफ करण्यात आला आहे.

(३) ऊस खरेदीकर कायद्यांतर्गत वर्षाची व्याख्या दि. १ ऑक्टोबर ते ३० सप्टेंबर, अशी आहे. त्यानुसार वर्ष २०१४-१५ हे अद्याप संपलेले नाही. त्यामुळे या वर्षामध्ये एकूण ऊस खरेदी कराची प्रत्यक्ष रक्कम किती असेल ते आजमितीस सांगता येणार नाही.

---

**उजनीचा डावा कालवा फुटून शेतक-यांचे झालेले नुकसान**

**(८) ९५९८ (०७-०४-२०१५). श्री. गणपतराव देशमुख (सांगोले), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दि. २५/१२/२०१५ रोजी अगर त्या सुमारास उजनीचा डावा कालवा सौंदणे ता. माहोळ गावाजवळ फुटून शेतक-यांच्या शेतीचे, घराचे व त्या भागातील रस्त्याचे नुकसान झाले आहे काय,

(२) असल्यास कालवा फुटण्याची कारणे काय आहेत,

(३) कालवा फुटल्यामुळे किती शेतक-यांच्या शेतीच्या पिकाचे, घराचे, रस्त्याचे व विजेच्या खांबाचे नुकसान झाले आहे,

(४) शेतक-यांना त्याची नुकसान भरपाई देण्यात आली आहे काय ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

दिनांक २५/०१/२०१५ रोजी उजनीचा डावा कालवा सौंदणे ता.मोहोळ गावांजवळ कालवा सा.क्र.१२४/३०० येथे फुटला होता.

(२) कालवा फुटीच्या कारणांची चौकशी करण्यासाठी महामंडळाने अधिक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. अद्याप अहवाल अप्राप्त आहे.

(३) शेतीच्या पिकांचे नुकसान झालेल्या व नुकसान देय शेतकऱ्यांची संख्या एक आहे. घराचे, रस्त्याचे व विजेच्या खांबाचे नुकसान झाले नाही.

(४) नुकसान भरपाईचा प्रस्ताव क्षेत्रियस्तरावर कार्यवाहीत आहे.

---

**गारपीटीमुळे होणाऱ्या फळबागांच्या नुकसानीपासून फळबागायत शेतकऱ्यांना संरक्षण देण्यासाठीची फळपिक विमा योजना**

**(९) ९६०३ (३०-०४-२०१५). श्री. गणपतराव देशमुख (सांगोले), श्री. गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयात शेतकऱ्यांनी २०१४-१५ या वर्षामध्ये प्रत्यक्षात लागवड केलेल्या पिकांना आर्थिक संरक्षण देणेकामी शासनाने हवामानावर आधारित पीक विमा योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जर पीक दुष्काळग्रस्त झाले व शासकीय सर्व्हेक्षणानुसार आणेवारी ४९ पैशांच्या आत झाली तर कापूस उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी २२ हजार रुपये तातडीने विमा रक्कम देण्याचे या योजनेमध्ये नमुद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त नमूद केलेल्या प्रमाणे शेतकऱ्यांचे नुकसान होऊनदेखील हंगाम उलटला तरीही अशाप्रकारे कुठलीही विमा रक्कम देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व किती कालावधीत उपरोक्त नुकसानीची रक्कम देणे अपेक्षित आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (२५-०५-२०१५) :** (१) होय,
(२) नाही. हवामान अधारित पीक विमा योजनेअंतर्गत संदर्भ हवामान केंद्रावर नोंद झालेल्या पर्जन्यमानाच्या आकडेवारीनुसार अधिसूचित केलेल्या योजनेच्या प्रमाणकांनुसार नुकसान भरपाई संबंधीत विमा कंपनीमार्फत निश्चित केली जाते. शासनाने जाहिर केलेल्या इतर कोणत्याही निकषांचे (पीक पैसेवारी, टंचाईसददृष्य परिस्थिती, पूर इ) आधारे नुकसान भरपाई निश्चित केली जात नाही.
(३) जळगाव जिल्हयामध्ये हवामान आधारित पीक विमा योजना खरीप २०१४ मध्ये कापूस, ज्वारी,उडीद व मुग या पिकांसाठी केंद्र शासनाच्य मार्गदर्शक सूचनानुसार खरीप २०१४ मध्ये पथदर्शक स्वरुपात क्षेत्र घटक धरुन (Area Approach) भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत राबविण्यात आली आहे.
या योजनेअंतर्गत जळगाव जिल्हयातील १२५७६३ शेतकऱ्यांनी योजनेत रु २९.२६ कोटीविमा हप्ता भरुन सहभाग भरपाईस पात्र ठरले असून या शेतकऱ्यांना रु ५०.७१ कोटी नुकसान भरपाई रक्कम भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत संबंधीत बँकांच्या खात्यावर जमा करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयातील विजवितरण कंपनीच्या पंढरपूर विभागातील बेसुमार रोहित्रे जळाले असल्याबाबत**

**(१०) ९६०४ (३०-०४-२०१५). श्री. गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हयातील विजवितरण कंपनीच्या पंढरपूर विभागातील सांगोले, मंगळवेढा व पंढरपूर तालुकयातील माहे सन २०१४ या वर्षात ८९७ रोहित्रे जळली आहेत, हे खरे ओह काय,

(२) असल्यास, रोहित्रे जळण्याचे प्रमाण बेसुमार वाढल्याने शेतक-यांच्या पिकांचे अतिशय नुकसान होत आहे,
(३) असल्यास, कृषी पंपाची रोहित्रे जळण्याचे प्रमाण नियंत्रणात आणण्यासाठी शासनाने काय उपाय योजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०४-२०१५)** :(१) होय.
(२) सन २०१४ या सालामध्ये जळालेले रोहित्रे सरासरी ८ ते १० दिवसांमध्ये बदलण्यात आले आहेत. त्यामुळे शेतक-यांच्या पिकांचे अतिशय नुकसान होत आहे. असे म्हणणे संयुक्तीक वाढत नाही.
(३) कृषीपंपाची रोहित्रे जळण्याचे प्रमाण नियंत्रणात आणण्यासाठी महावितरण कंपनीने पायाभूत सुविधा आराखडा-२ ही योजना मंजूर केली आहे ज्यामध्ये अतिभारीत रोहित्र व वारंवार जळणारे रोहित्रांच्या ठिकाणी नवीन अतिरिक्त रोहित्रे व रोहित्रे क्षमता वाढ ची कामे हाती घेण्यात आली आहेत.

---

### मागील वर्षातील अर्थसंकल्पातील ६३ टक्के निधी खर्च न केल्याबाबत

**(११) ९६३० (०८-०४-२०१५). श्री. विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गेल्या वर्षी अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदीतील सुमारे ६३ टक्के निधी खर्च न केल्याचे दिनांक २४ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अर्थसंकल्पातील तरतुद केलेला निधी खर्च न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, शासनाच्या कोणकोणत्या विभागात पूर्ण निधी आतापर्यंत खर्च करण्यात आलेला आहे,
(४) असल्यास, संबंधित निधी न खर्च करणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०५-२०१५)** :(१), (२), (३) व (४) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात रु.२,३०,९३२.६३ कोटी इतकी सुधारित तरतुद करण्यात आली आहे. मा.महालेखापाल, मुंबई कार्यालयाकडून फेब्रुवारी, २०१५ अखेरच्या खर्चाची माहिती प्राप्त झाली आहे. या माहितीनुसार, सुधारित तरतूदीच्या तुलनेत फेब्रुवारी, २०१५ अखेर रुपये १,६७,१९७.८४ कोटी इतका खर्च झाला आहे. सुधारित तरतूदीशी खर्चाचे प्रमाण सुमारे ७२.४०% इतके आहे.

---

**पोंथवाडी ता.करमाळा जि.सोलापूर येथे तलाठी व कोतवालास केलेल्या मारहाणीबाबत**

**(१२) ९६३७ (०७-०४-२०१५). श्री. विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोंधवाडी (ता.करमाळा जि.सोलापूर) येथे तहसिलदारानी दिलेल्या रस्त्याच्या निकालाचे समन्स बजावण्यास गेलेल्या तलाठी बालाजी नागटिळक व कोतवाल रामभाऊ खरांत या दोघांना महादेव राऊत सह इतर लोकांनी काठया व दगडांनी मारहाण केल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलिसांनी संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०५-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी एकूण ४ आरोपींविरुध्द दि.२३.१.२०१५ रोजी करमाळा पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र.२२/२०१५ भारतीय दंडविधान संहिता कलम ३५३, ३३२, ५०४, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्यात आली असून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ पूणे येथे स्थापन करण्याबाबत**

**(१३) ९६६४ (६/४/२०१५). श्री. जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री. संग्राम थोपटे (भोर), अॅड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. नसीम खान (चांदिवली), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री. योगेश टिळेकर (हडपसर), श्री. भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ पूणे येथे स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८/४/२०१५) :**(१) मुंबई उच्च न्यायालयाचे नवीन खंडपीठ स्थापन करण्याबाबत उच्च न्यायालयास तसेच केंद्र शासनास शिफारस करण्याबाबत अद्यापि निर्णय झालेला नाही.

(२) राज्यात उच्च न्यालयाचे कायमस्वरुपी खंडपीठ स्थापन करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनास मान्यतेसाठी पाठविण्यापूर्वी त्यास राज्य पुर्नरचना अधिनियम, १९५६ च्या कलम ५१ (२) नुसार मा.मुख्य न्यायमूर्तीची सहमती आवश्यक आहे. पुणे जिल्ह्यासह कोल्हापूर, सोलापूर, सातारा, सांगली, अमरावती, नाशिक इत्यादी ठिकाणी येथे मा.उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन

करण्याच्या संदर्भात वेळोवेही तारांकित प्रश्न, अतारांकित प्रश्न, ठराव मान्यवरांकडून प्राप्त होतात. त्या अनुषंगाने उच्च न्यायालयाकडून अभिप्राय मागविण्यात आले असता उच्च न्यायालयाच्या दि. १८/०७/१९९६, दि. २५/७/२००७, दि.७/५/२००८, दि.५/१२/२००९, दि.१७/१०/२०१० व दि.२५/३/२०११ च्या पत्रान्वये उच्च न्यायलयाचे खंडपीठ अन्यत्र स्थापन करणे लाभदायक व उचित नसल्याचे अभिप्राय शासनास प्राप्त झाले त्यामुळे यापुर्वी प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आलेला नाही.

सद्यःस्थितीत नवीन खंडपीठासाठी विविध स्तरातून होणाऱ्या मागणीस अनुसरुन ती तपासून अहवाल सादर करण्याबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या मा.मुख्य न्यामूर्तींनी तीन न्यामूर्तींची समिती गठीत केली आहे. सदरहू मागणी या समितीच्या विचाराधीन आहे त्याचप्रमाणे मा.मुख्य न्यायमूर्तींनी त्यांच्या दि. ११/०८/२०१४ च्या मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांना अग्रेषित केलेल्या पत्रान्वये अशी विनंती केली आहे की, मुंबई उच्च न्यायालयाचे नवीन खंडपीठ राज्यात केवळ कोल्हापूर येथे स्थापन करणे वाजवी होईल किंवा कसे, याबाबत शासनाचे मत उच्च न्यायालयास कळविण्यात यावे त्यानुसार यासदंर्भात शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील होणाऱ्या खाद्यपदार्थांच्या भेसळीबाबत**

**(१४) ९६८२ (०६-०४-२०१५). श्री. विजय काळे (शिवाजीनगर), श्री. योगेश टिळेकर (हडपसर), श्री. जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री. भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अन्न व औषध प्रशासनाने दिनांक ३१ डिसेंबर, २०१४ ते दिनांक १ जानेवारी, २०१५ या कालावधीमध्ये वा त्या दरम्यान छापा टाकून केलेल्या तपासणीमध्ये खाद्यपदार्थाचे २०० हून अधिक भेसळीचे प्रकार निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तदनुषंगाने भेसळ करणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२१-०५-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) दि.३१/१२/२०१४ ते दिनांक ०१/०१/२०१५ या कालावधीमध्ये संपूर्ण महाराष्ट्र राज्यात अन्न व औषध प्रशासनातर्फे विशेष मोहिम राबविण्यात आलेली होती. या मोहिमे दरम्यान १६६ अन्न नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले त्यापैकी १५६ नमुने प्रमाणित घोषित झाले असून, ५ नमुने कमी दर्जाचे व ५ नमुने खाद्यरंग आढळून आल्याने असुरक्षित घोषित झालेले आहेत. कमी दर्जाच्या नमुन्याप्रकरणी न्यायनिर्णयासाठी प्रकरणे दाखल करण्यात येत असून, असुरक्षित नमुन्यांप्रकरणी न्यायालयामध्ये खटले दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यात मागील ७ महिन्यात ३०६ पेक्षा अधिक रोहित्र चोरीला गेल्याच्या घटनाबाबत**

**(१५) ९७०३ (०४-०४-२०१५). श्री. विजय काळे (शिवाजीनगर), श्री. योगेश टिळेकर (हडपसर), श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री. भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात मागील ७ महिन्यात ३०६ पेक्षा अधिक रोहित्र चोरीला गेल्याच्या घटना माहे जानेवारी, २०१५ दरम्यान निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व तद्नुषंगाने पुढे काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०५-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे, पुणे जिल्ह्यामध्ये १ जून २०१४ ते ३१ डिसेंबर,२०१४ या कालावधीमध्ये रोहित्र चोरीच्या एकूण २७२ घटना घडलेल्या आहेत. त्यापैकी पुणे परिमंडळांतर्गत १ जून, २०१४ ते ३१ डिसेंबर,२०१४ या कालावधीत एकूण १०७ रोहित्रे चोरीला जाण्याच्या घटना घडलेल्या आहेत तसेच बारामती ग्रामीण मंडल-कार्यालयांतर्गत ६ तालुक्यांमधील जून २०१४ ते डिसेंबर,२०१४ पर्यंत एकूण १६५ रोहित्र चोरीला गेल्याच्या घटना घडलेल्या आहेत.

(२) पुणे जिल्ह्यामध्ये महावितरण कंपनीकडून पुणे परिमंडळ व बारामती परिमंडळ अंतर्गत सर्व रोहित्र चोरीच्या घटनासंदर्भात संबंधित पोलीस स्टेशनमध्ये एफआयआर नोंदविण्यात आले असून चोरी झालेल्या ठिकाणी नवीन रोहित्रे बसविण्यात आलेली आहेत. तसेच रोहित्रांचे खांबांबरोबर टॅग वेल्डिंग करणे, रात्रीच्या वेळेस विशेष गस्तपथाद्वारे टेहळणी करणे तसेच सदरच्या घटना पुन्हा घडू नये म्हणून सदरील गावातील लोकांना रोहित्रांवर अनोळखी व्यक्तीकडून संशयास्पद हालचाली आढळल्यास नजिकच्या महावितरण कंपनीच्या कार्यालयास वा पोलीस स्टेशन यांना कळविण्याबाबत आवाहन करण्यात आले आहे. पोलीस स्टेशनमध्ये एफआयआर दाखल झालेल्या प्रकरणांचा तपास पोलीस यंत्रणेकडून चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाडयात तीव्र पाणी टंचाई निर्माण झाल्याबाबत**

**(१६) ९७३० (०७-०४-२०१५). श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयातील जायकवाडी, विष्णुपुरी, येलदरी, सिध्देश्वर मांजरा व तेरणा आदी प्रकल्पामधील जलसाठा ५० टक्यापेक्षा कमी झाल्यामुळे ऐन हिवाळयातच मराठवाडयावर तीव्र पाणी टंचाई निर्माण झाल्याचे माहे जानेवारी २०१५ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, मराठवाडयांत निर्माण झालेली तीव्र पाणी टंचाईची समस्या सोडविण्यासाठी शासनाने कोणती विशेष उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२५-०५-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे. दि.१५/१०/२०१४ रोजी मराठवाड्यातील जायकवाडी प्रकल्पामध्ये ९१९.०० दलघमी (४२.३२%), मांजरा व निम्न तेरणा या प्रकल्पांमध्ये अनुक्रमे २३.४० लदघमी (१०.४४%) व ९.३६१ लघमी (७.७२%) तसेच विष्णुपूरी प्रकल्पामध्ये ७२.५० दलघमी (८९.४२%), येलदरी प्रकल्पामध्ये ४८५.२०१ दलघमी (५९.९२%) सिध्देश्वर प्रकल्पामध्ये (-) १२.०९ दलघमी (०.००%) इतका पाणीसाठा होता.
(२) पाणी टंचाई निवारणासाठी संबंधीत जिल्हाधिकारी यांचे मार्फत पिण्यासाठी उपलब्ध पाणीसाठ्याच्या आधारे पाणीसाठा आरक्षित करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**साकोली (ता.साकोली, जि.भंडारा) येथील आधारभूत धानखरेदी योजनेबाबत**

**(१७) ९७३३ (१०-०४-२०१५). श्री. राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साकोली (ता.साकोली, जि. भंडारा) येथील आधारभूत धानखरेदी केंद्रावर २ कोटी ३२ लाख १७ हजार रुपये, विर्शी केंद्रावर १ कोटी १९ लाख ३७ हजार रुपयांचे धान खरेदी करण्यात आले असून संबंधित धानखरेदीतून साकोली केंद्रावर ९३ लाख ९२ हजार ८४० रुपयांचे व विर्शी केंद्रातील ७५ लाख ३३ हजार रुपयांचे चुकारे अद्याप शिल्लक असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा मार्केटींग फेडरेशनच्या सदोष नियोजनामुळे जिल्ह्यात शासकीय आधारभूत धान खरेदी योजनेअंतर्गत ४९ केंद्रावरुन खरेदी करण्यात आलेल्या धानाचे १० कोटी रुपयांचे चुकारे रखडल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला असल्याचे निदर्शनास आले, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार यात जबाबदार फेडरेशनच्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व भंडारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे हित लक्षात घेता शासनाने धानाचे चुकारे तातडीने मिळण्यासाठी कोणती उपाययोजना केली आहे ?

**श्री. गिरीश बापट (१६-०५-२०१५) :**(१), (२) व (३) व (४) आधारभूत किंमत खरेदी योजने अंतर्गत हंगाम २०१४-१५ मध्ये भंडारा जिल्हयात साकोली केंद्रावर २५,३२८.२० क्विंटल धान रक्कम रु. ३,४४,४६,३५२/- व विर्शी केंद्रावर १५,४६३.५० क्विंटल धान रक्कम रु. २,१०,३०,३६०/- माहे जानेवारी २०१५ अखेर खरेदी करण्यात आला होता.

सदर धानाची पूर्ण रक्कम संबंधित शेतक-यांना माहे जानेवारी २०१५ अखेर अदा करण्यात आली आहे.

धान खरेदीच्या शेतकरी चुका-याची रक्कम खरेदी दाव्यांनुसार शासनाकडून प्राप्त होते. ज्या दिवशी रकमा जमा होतात शक्यतो त्याच दिवशी शेतकरी चुका-याच्या रक्कमा बँकेमार्फत अदा केल्या जातात.

---

**चंद्रपूर जिल्ह्यातील पकडीगुडडम धरणाचे पाणी २०१२ पर्यंत अंबुजा सिमेंट कंपनीला देण्याच्या कराराबाबत**

**(१८) ९७४१ (०७-०४-२०१५). श्री. राजेश काशीवार (साकोली), श्री. नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील पकडीगुडडम धरणाचे पाणी २०१२ पर्यंत अंबुजा सिमेंट कंपनीला देण्याचा करार करण्यात आला होता. त्यानंतर त्या करारात २०१८ पर्यंत पुन्हा वाढ करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धरणाच्या पाण्याअभावी १००० हेक्टर सिंचन क्षेत्राला फटका बसला असून परिसरातील १२ गावातील शेतकरी पाण्यापासून वंचित आहेत. याचा फटका रब्बी हंगामातील १४०० हेक्टर क्षेत्रातील पिकांना बसणार आहे. तसेच मागील १० वर्षापासून प्रकल्पाची उंची वाढविण्याची मागणी सुध्दा होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कंपनीकडून कोणतीही विकासाची कामे करण्यात आली नसल्यामुळे शेतकऱ्यांचा रोष लक्षात घेता कंपनीसोबत झालेला करार रदद करुन शेतक-यांना पाणीपुरवठा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, नसल्यास विलंबाची कारणे ?

**श्री. गिरीष महाजन (२५-०५-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) अंबुजा सिमेंट कंपनीला पाणी दिल्यामुळे ८०२ हेक्टर पुच्छ भागाचे सिंचन क्षेत्रात कपात झालेली आहे.

होय, कमी झालेली सिंचन क्षेत्र पुनर्स्थापित करण्यासाठी धरणाची उंची वाढविणे प्रस्तावित आहे.

(३) कंपनीला १८ वर्षाचे कालावधीकरिता पाणी वापराची मंजुरी असल्यामुळे करार रद्द करण्यात आलेला नाही. कपात झालेले सिंचन क्षेत्र पुनर्स्थापित करण्याकरिता धरणाची उंची वाढविण्याचा प्रस्ताव तयार करण्यात येत आहे.

---

**ग्राम पिटेझरी (ता.साकोली, जि. भंडारा) या आदिवासी गावाला शासनाकडून कोणत्याही सोयी सवलती मिळत नसल्याबाबत.**

**(१९) ९७५८ (०७-०४-२०१५). श्री. राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयातील साकोली तालुकाअंतर्गत ग्राम पिटेझरी हे १०० टक्के आदिवासी गांव म्हणून प्रसिध्द असून या गावाला शासनाकडून कोणत्याही सोयी सवलती मिळत नसून तेथील नागरिकांनी स्वतंत्र ग्रामपंचायतीच्या मागणीचे निवेदन सन २०१२ मध्ये गटविकास अधिकाऱ्यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑगस्ट २०१४ मध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी सुध्दा या गावाला भेट दिली. परंतु अद्याप कोणतीही योजना या गावाकरीता आली नसून स्वतंत्र ग्रामपंचायतीची मागणी अधांतरी असल्याचे वृत्त २२ जानेवारी २०१५ च्या वृत्तपत्रातून निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या गावापासून ग्रामपंचायत १० कि.मी. अंतरावर असून ग्रामस्थांना जंगलातून मार्ग काढावा लागतो. त्यामुळे अशा गावांसाठी सोयी-सुविधा पुरविण्यासाठी आणि या गावाला स्वतंत्र ग्रामपंचायत निर्माण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०५-२०१५) :**(१) नाही.

(२), (३) व (४) मा.जिल्हाधिकारी, यांनी ऑगस्ट, २०१४ मध्ये अतिदुर्गम भागातील भेटीदरम्यान दिलेल्या निर्देशानुसार मौजे पिटेझरी येथे स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेबाबतचा प्रस्ताव गट विकास अधिकारी, पं.स. साकोली यांचेमार्फत जिल्हा परिषदेस सादर करण्यात आला. तथापि, दिनांक १२ फेब्रुवारी, २००४ च्या शासन निर्णयानुसार आदिवासी/तांडा या भागासाठी तसेच, दोन गावात ३.०० कि.मी. पेक्षा जासत अंतर असेल तर, अशा गावात ग्रामपंचायत स्थापन करण्यासाठी किमान लोकसंख्या १००० असणे आवश्यक आहे.

मौजे पिटेझरी या महसुली गावाची लोकसंख्या ५९७ इतकी असल्यामुळे या गावासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करता येत नाही.

---

## भंडारा जिल्हयातील लाखनी तालुक्यातील पालांदुर येथेत सिंगल फेस अनुसार विद्युत पुरवठा केला जात असतानही भारनियमन सुरु असल्याबाबत

**(२०) ९७६० (३०-०४-२०१५). श्री. राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयातील लाखनी तालुक्यातील पालांदुर येथे ३३ केव्हीचे विद्युत सबस्टेशन लावण्यात आले असून त्या अंतर्गत सिंगल फेस अनुसार विद्युत पुरवठा केला जात असतनासुध्दा येथे भारनियमन सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे ओह काय,

(२) असल्यास, भारनियमन पहाटे होत असल्यामुळे १० वी आणि १२ वी च्या विद्यार्थ्यांना अभ्यास करताना अडचणी निर्माण होत असून, परिसरातील पोहरा, लाखनी, बारव्हा, सानगडी, मुरवाडी येथे भारनियमन होत नसल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे, हे खरे आह काय,

(३) असल्यास, सदर गावातील सिंगल फेस रोस्टर बदलून भारनियमन बंद करण्यासाठी जिल्हाप्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची सर्वसाधरण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०८-०५-२०१५)** :(१) नाही.

(२) नाही. भंडारा जिल्हयातील लाखनी तालुक्यात पालांदूर येथे ३३/११ केव्हीचे सबस्टेशन असून ११ केव्ही मारेगांव, ११ केव्ही गोंडेगांव व ११ केव्ही पालांदूर फिडरद्वारे त्या ठिकाणी सिंगल फेज योजनेद्वारे विज पुरवठा करण्यात येत आहे.

सदर वाहिन्यांवर कृषी ग्राहकांसाठी दिवसा ८ तास अथवा रात्री १० तास थ्री फेज विद्युत पुरवठा चक्राकार पध्दतीने करण्यात येतो.

सदर वाहिन्या A,B,C,D ग्रुपमध्ये येत असल्यामुळे या वाहिन्यांवर थ्री फेज विद्युत पुरवठ्याचा व्यतिरिक्त उर्वरीत कालावधीमध्ये सिंगल फेज विद्युत पुरवठा करण्यात येतो. ग्राहकांसाठी २४ तास सिंगल फेज वीजेची उपलब्धता असते.

तसेच १० वी १२ वी परिक्षांच्या कालावधीत विद्यार्थ्यांच्या सोईसाठी संपूर्ण राज्यात दि.२१.०२.२०१५ ते दि.२६.०३.२०१५ पर्यंत पूर्णपणे भारनियमन मागे घेण्यात आले होते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारा जिल्हयातील तुमसर वनपरिक्षेत्रांतर्गत येणा-या बपेरा वनक्षेत्रात खैरटोला गावातील विविध प्रजातीची १५० झाडे कापण्यात आल्याबाबत**

**(२१) ९७६४ (०७-०४-२०१५). श्री. राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयातील तुमसर वनपरिक्षेत्रांतर्गत येणा-या बपेरा वनक्षेत्रात खैरटोला या गावातील विविध प्रजातीची १५० झाडे कापण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वृक्षतोड नियमबाहयरित्या करण्यात आली असल्याच्या तक्रारी वृत्तपत्रातून झळकत असून नियमानुसार उपविभागीय अधिकारी किंवा वनविभागाची रितसर परवानगी घेण्यात आली आहे काय, अशाप्रकारे नियमबाहय वृक्षतोड करणारे व त्यांना पाठपुरावा करणा-या अधिका-यावर शासन कोणती कार्यवाही करणार आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५)** :(१) भंडारा जिल्हयातील तुमसर वनपरिक्षेत्रांतर्गत येणा-या बपेरा वनक्षेत्रात मौजा खंडाळ येथे विविध प्रजातींच्या एकूण ८५ वृक्षांची तोड झालेली आहे. यात खाजगी गटामधील २६ व राजस्व विभागाच्या ताब्यातील ५९ वृक्षांचा समावेश आहे. वनविभागाचे क्षेत्रात वृक्षतोड झालेली नाही.

(२) सदर प्रकरणी विनापरवाना वृक्षतोड केलयाप्रकरणी संबंधित वनरक्षकाने दि. १७.०१.२०१५ अन्वये प्र.सु.री. नोंद करुन एकूण १७.३७० घ.मी. माल जप्त केला. प्रस्ततु प्रकरणी तहसीलदार, तुमसर यांनी दिनांक २७.०४.२०१५ अन्वये कास्तकार श्रीमती सुशीला नारायणसिंग बस यांना महाराष्ट्र जमीन महसूल नियम, १९६७ अन्वये रु.१,००० इतका दंडा आकारला आहे.

---

**साकोली (जि.भंडारा) मंडळ कृषी कार्यालयांतर्गत सानगडी येथील**
**कृषी सहाय्यकाचे पद रिक्त असल्याबाबत**

**(२२) ९७६५ (०७-०४-१५). श्री. राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील साकोली मंडळ कृषी कार्यालयांतर्गत सानगडी येथील कृषी सहाय्यकाचे पद गेल्या दीड वर्षांपासून रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिसरातील शेतकऱ्यांना कृषीविषयक योजनांची माहिती घेण्यासाठी कि.मी. पर्यंत पायपीट करावी लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांचे हित लक्षात घेत शासन सानगडी येथील कृषी सहाय्यकाचे पद किती कालावधीत भरणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१९-०५-१५) :**(१) व (२) हे खरे नाही. सानगडी येथे दि. २६/०९/२००८ पासून कृषि सहायक कार्यरत आहे. सदरचा कृषि सहायक वारंवार गैरहजर रहात असल्यामुळे त्यांचेविरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रस्तावित आहे. उपरोक्त कृषि सहायकाच्या गैरहजेरीमध्ये नजीकच्या कृषि सहायकाकडेअतिरिक्त कार्यभार देऊन त्यांचेमार्फत शेतकऱ्यांना कृषि विषयक योजनांची माहिती दिली जात आहे.

(३) व (४) सद्य कार्यरत कृषि सहायक मे-२०१५ च्या सार्वत्रिक बदली कालावधीमध्ये बदलीस पात्र असल्याने त्यांचे बदली इतरत्र करुन त्यांचे ऐवजी दुसरे कृषि सहायकांची नियुक्ती केली जाईल.

---

**किनवट व माहूर तालुक्यातील (जि.नांदेड) वृक्षांचे संवर्धन होण्याऐवजी**
**सागवानी वृक्ष नामशेष होत असल्याबाबत**

**(२३) ९८१५ (०७-०४-२०१५). श्री. प्रदीप नाईक (किनवट), श्री. राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट व माहूर तालुक्यातील (जि.नांदेड) वनक्षेत्रासाठी त्याच्या संवर्धनासाठी शासनाने फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉरपोरेशन महामंडळाची स्थापना केली परंतु सदर महामंडळाच्या कायक्षेत्रातील भौगोलिक विस्तार पहाता वृक्षांचे संवर्धन होण्याऐवजी सागवानी वृक्ष नामशेष होत असल्याचे माहे फेब्रुवारी च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) एफ.डी.सी.ए. चे अधिकारी हे जंगलातील वनांचे संरक्षण व संवर्धन करायचे सोडून विकासाच्या नावाखली चांगली झाडे तोडून जंगलाची विल्हेवाट लावत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्यापपर्यंत कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे कय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-०५-२०१५)** :(१) व (२) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या मापन्यतेने सदर वन क्षेत्राचे व्यवस्थापन करण्यासाठी सन २००६-०७ ते २०१५-१६ या कालावधीचा व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात आला आहे. सन २०१४-१५ मध्ये केंद्र शासनाच्या मंजुरीनुसार वनव्यवस्थापन व वनसंवर्धनासाठी खालीलप्रमाणे कामे करण्यात आली आहेत.

| कार्यवर्तुळ | कक्ष | क्षेत्र |
|---|---|---|
| साग रोपवन व्यवस्थापन कार्यवर्तुळ - विरळण | ७ | १७५.००० हे. |
| साग रोपवन पुनरुत्पादन कार्यवर्तुळ | १ | ५०.००० हे. |
| सुधारणा कार्यवर्तुळ | ८ | ४८७.९४६ हे. |

यामध्ये वनसंवर्धनाच्या दृष्टिने अयोग्य अशीच मेलेली, मरत असलेली , वाळलेली रोगट, अतिशय वाकलेली, पोकळ व ओबडधोबड आकाराची झाडे विरळण व सुधारणा तोडीच्या कामांतर्गत तोडण्यात आली आहेत.

वरीलप्रमाणे केंद्र शासनाच्या मंजुर कामाव्यतिरिक्त कोणतेही क्षेत्रात वृक्ष तोडीची कामे केलेली नाहीत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### किनवट तालुक्यातील पशुधन विकास अधिका-यांची मंजूर पदे तातडीने भरण्याबाबत

**(२४) ९८१८ (३०-०४-२०१५). श्री. प्रदीप नाईक (किनवट), श्री. राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट तालुक्यातील पशुधन विकास अधिका-यांच्या मंजूर १३ पैकी ६ जागा रिक्त असून माहूर तालुक्यातील ७ मंजूर जागांपैकी एकूण ६ जागा रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (०८-०५-२०१५)** :(१) होय हे खरे आहे.

(२) पशुसंवर्धन विभागात पशुधन विकास अधिकारी गट-अ संवर्गाची रिक्त असलेली एकूण ३७२ पदे भरण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र सादर करण्यात आले होते. त्यानुसार आयोगाने दि. १२.३.२०१५ रोजी ३०० पात्र उमेदवारांची यादी जाहीर केलेली आहे. सदर उमेदवारांची वैद्यकीय तपासणी व पूर्व चारित्र्य पडताळणी करुन त्यांना पदस्थापना

देण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर अधिका-यांना पदस्थापना देताना किनवट व माहूर तालुक्यातील रिक्त पदे भरणेबाबत कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**किनवट येथे उपवन संरक्षक कार्यालयाची स्थापना करण्याची मागणी**

**(२५) ९८२० (०७-०४-२०१५). श्री. प्रदीप नाईक (किनवट), श्री. राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट व माहूर तालुका हा आदिवासी नक्षलग्रस्त भाग असून विदर्भ आणि आंध्रप्रदेशच्या सिमेलगत आहे, गेल्या १० - १५ वर्षापासून उपवन संरक्षक कार्यालयाची स्थापना किनवट येथे करण्याची मागणी तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार करुन सुध्दा याबाबत अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विशेषतः नांदेड जिल्ह्याची वनजमिन लक्षात घेता एकूण १,३०,००१.६१० हेक्टर जमिनीपैकी किनवट माहूर तालुक्याची वन जमीन ७६,४९०.५०३ हेक्टर एवढी असून एवढ्या मोठ्या वनक्षेत्रास उपवन संरक्षक कार्यालय कार्यान्वीत करणे गरजेचे आहे काय
(३) असल्यास, ऊपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येणार आहे,
(४) अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०६-२०१५) :**(१) होय.
(२), (३) व (४) किनवट येथे उप वनसंरक्षक कार्यालयाची स्थापना करण्याकरिता प्राप्त झालेल्या प्रस्तावाची तपासणी करुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

---

**प्रस्तावित वीज दरवाढ करु नये म्हणून कोल्हापूर जिल्हयातील औद्योगिक संघटनेने सर्व उद्योग बंद ठेवण्याचा घेतलेला निर्णय**

**(२६) ९८३४ (३०-०४-२०१५). श्री. रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रस्तावित वीज दरवाढ करु नये किमान दोन महिने सबसिडी द्यावी, अन्य राज्यांच्या तुलनेत वीजेचे दर निश्चित करावेत तोपर्यंत वीजदर वाढ करुन नये याकरिता दिनांक १२, १३ व १४ जानेवारी, २०१५ या कालावधीत कोल्हापूर जिल्हयातील सर्व उद्योग बंद ठेवण्याचा निर्णय औद्योगिक संघटनेने घेतला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उद्योजकांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) उक्त मागण्याच्या संदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे तसेच बंदमुळे झालेल्या नुकसानीची भरपाईबाबत स्वरूप काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०८-०५-२०१५)** : (१) अंशत: खरे आहे. कोल्हापूरच्या दिनांक १०.१.२०१५ रोजीच्या स्थानिक वृत्तपत्रांमध्ये दिनांक १२.१.२०१५ ते दिनांक १४.१.२०१५ रोजी उद्योग बंद ठेवण्याबाबतचा इशारा उद्योजकांनी दिलेला होता. परंतु सदर कालावधीत होणारा " उद्योग बंद" मागे घेण्यात आला होता.

(२) औद्योगिक संघटना व इतर यांनी दिनांक २८.२.२०१५ रोजी मा.मुख्यमंत्री यांना अग्रेषित केलेल्या निवेदनात प्रामुख्याने वीज दरवाढ स्थिर ठेवणे, वीज गळती कमी करणे, भांडवली खर्चामध्ये कपात करणे, भ्रष्टाचारास आळा घालणे, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या चेअरमनपदी उच्च न्यायालयाचे कार्यरत वा निवृत्त न्यायमूर्ती यांची नेमणूक करणे इत्यादी मागण्या होत्या.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नारायण पेठ, पुणे येथे थंडीपासून संरक्षणासाठी घरात शेगडी पेटवून झोपी गेलेल्या तीन व्यक्तींचा धुरामुळे गुदमरून मृत्यू झाल्याबाबत.**

**(२७) ९८४४ (०६-०४-२०१५). श्री. रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नारायण पेठ, पुणे येथील कबीर बागेजवळ थंडीपासून संरक्षणासाठी घरात शेगडी पेटवून झोपी गेलेल्या घरातील तीन व्यक्तींना धुरामुळे गुदमरून मृत्यू झाल्याची घटना दिनांक ११ जानेवारी, २०१५ रोजी घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी पोलिसांनी सखोल चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१५)** :(१) होय.

(२) व (३) सदर प्रकरणी श्री.भगवान धोंडीबा घारे हे त्यांच्या राहत्या घरी पत्नी व मुलीसह झोपले असता दुस-या दिवशी सकाळी दरवाजा न उघडल्याने त्यांच्या दरवाजा तोडून आतमध्ये प्रवेश केला असता श्री.घारे हे राहते घरी कोळशाची शेगडी पेटवून झोपले असता बेशुध्द अवस्थेत आढळून आले व हॉस्पीटलमध्ये आणले असता डॉक्टर तपासणीपूर्वीच मयत झाल्याचे डॉक्टारांनी घोषीत केले.

वैद्यकीय अधिकारी यांनी मृत्यूचे कारण दिले नसून त्यांचा व्हिसेरा राखून ठेवला आहे. याबाबत विश्रामबाग पोलीस स्टेशन येथे दि. ११ जानेवारी, २०१५ रोजी अकस्मात मयत क्रमांक ०३/१५, फौजदारी दंड प्रक्रिया संहिता क्र.१७४ दाखल करण्यात आले आहे. सदर प्रकरणाचा पोलीस तपास सुरु आहे.

---

## राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना अपघात विमा संरक्षण देण्याच्या निर्णयाबाबत

**(२८) ९८४५ (०६-०४-२०१५). श्री. रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री. संग्राम थोपटे (भोर), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. नसीम खान (चांदिवली), श्री. पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री. राहुल मोटे (परांडा), श्री. सुरेश लाड (कर्जत), श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (मिरज) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या सुरक्षिततेसाठी अपघात विमा संरक्षण देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरूप काय आहे व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०५-२०१५) :**(१) नाही.

(२) व (३) करीता प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई, पुर्व द्रुतगती महामार्गावर विक्रोळी येथील गोदरेज कामगार वसाहतीच्या मागील सर्व्हिस रोड वर अतिक्रमण झाले असल्याबाबत

**(२९) ९८९३ (१०-०४-२०१५). श्री. सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, पुर्व द्रुतगती महामार्गावर विक्रोळी येथील गोदरेज कामगार वसाहतीच्या मागील सर्व्हिस रोड हा पूर्णत: अतिक्रमीत होवून या ठिकाणी दुकाने थाटले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सर्व्हिस रोडवर झालेली अतिक्रमणे हटवून वाहतुकीसाठी रस्ता मोकळा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच यापुढे अतिक्रमण होवू नये म्हणून शासनाने काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०५-२०१५) :**(१) हे खरे नाही तथापि महामार्गाच्या हद्दीबाहेर अतिक्रमणे आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील उद्योग क्षेत्रातील परवाने पध्दत पारदर्शी करण्याबाबत**

**(३०) ९८९९ (०९-०४-२०१५). श्री. सुनिल राऊत (विक्रोळी), श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उद्योग क्षेत्रातील अत्यंत गुंतागुंतीची परवाने पध्दत तसेच परवाने मिळविताना होणारी अडवणूक व प्रशासकीय पातळीवरील दिरंगाई या उद्योजकांची तक्रार लक्षात घेऊन उद्योग परवाना पध्दत सुटसुटीत, पारदर्शी करण्याचे शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विचाराधीन असलेल्या प्रश्नाबाबत राज्य शासनाने निर्णय घेऊन अंमलबजावणी केली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१५-०५-२०१५) :** (१) होय.

राज्यातील उद्योग व व्यवसाय स्थापन करण्यासाठी विविध मान्यता व ना हरकती तातडीने व सुलभरित्या उपलब्ध व्हाव्यात या हेतूने "मेक इन महाराष्ट्र" हा उपक्रम हाती घेण्याचा निर्णय मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७/११/२०१४ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

(२) "मेक इन महाराष्ट्र" या उपक्रमांतर्गत राज्यातील उद्योगांना लागणारे विविध परवाने / संमती यांची संख्या व त्यासाठी लागणारा कालावधी कमी करण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उप समिती स्थापन करण्यास तसेच राज्यात गुंतवणूक करणा-या उद्योगांना लागणा-या विविध परवाने / संमती जलद गतीने उपलब्ध करुन देण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली संबंधित विभागांच्या सचिवांची शक्तीप्रदान समिती गठीत करण्यास शासन निर्णय क्रमांक - मेइम-२०१४/प्र.क्र.८८/उद्योग-८ दिनांक ८/१/२०१५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

तसेच दिनांक १५/१/२०१५ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीत सर्व संबंधित प्रशासकीय विभागांना उद्योगांना देण्यात येणा-या मंजू-यांच्या संख्येत कपात करणे, मंजूरी प्रक्रियेसाठी लागणारा कालावधी कमी करणे, विविध योजनांचे विलीनीकरण करुन एकच सर्वंकष योजना राबविणे, प्रचलित कायदे, धोरणे, कार्यनियमावली, तपासणी यंत्रणा यासारख्या बाबींत बदल / सुधारणा करणे व त्यासाठी विहित कालमर्यादा ठरवून देण्याचे निर्देश मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिले आहेत.

त्यानुषंगाने प्रधान सचिव (उद्योग) सातत्याने विविध प्रशासकीय विभागांच्या वरिष्ठ अधिका-यांसमवेत बैठका घेऊन सदर प्रकरणी शासन स्तरावरुन करावयाच्या कार्यवाहीबाबत ठोस व जलद निर्णय घेण्यासाठी पाठपुरावा करत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात उद्योगधंद्यांना चालना मिळण्याबाबत**

**(३१) ९९०२ (१०-०४-२०१५). श्री. सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात उद्योगधंद्याच्या वाढीसाठी मा.मुख्यमंत्री यांनी विविध उद्योग समुहांशी माहे डिसेंबर, २०१४ मध्ये बैठक घेऊन चर्चा केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या चर्चेचे फलित काय आहे,

(३) असल्यास, राज्यात उद्योगधंद्यांना चालना मिळण्यासाठी राज्यशासन कोणती पावले उचलणार आहे,

(४) तसेच उद्योगधंद्या करिता जाग्र व इतर मंजूरी विनाविलंब देण्याबाबत कोणती उपाययोजना करणार आहे,

(५) अद्याप प्रश्न भाग ४ बाब उपाययोजना करण्यात आली नसल्यास, त्यंची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१५-०५-२०१५) :** (१) राज्यातील उद्योग व व्यवसाय स्थापन करण्यासाठी विविध मान्यता व ना हरकती तातडीने व सुलभरित्या उपलब्ध व्हाव्यात या हेतूने "मेक इन महाराष्ट्र" हा उपक्रम हाती घेण्याचा निर्णय मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७/११/२०१४ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

(२) "मेक इन महाराष्ट्र" या उपक्रमांतर्गत राज्यातील उद्योगांना लागणारे विविध परवाने / संमती यांची संख्या व त्यासाठी लागणारा कालावधी कमी करण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उप समिती स्थापन करण्यास तसेच राज्यात गुंतवणूक करणा-या उद्योगांना लागणा-या विविध परवाने / संमती जलद गतीने उपलब्ध करुन देण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली संबंधित विभागांच्या सचिवांची शक्तीप्रदान समिती गठीत करण्यास शासन निर्णय क्रमांक - मेइम-२०१४/प्र.क्र.८८/उद्योग-८ दिनांक ८/१/२०१५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

तसेच दिनांक १५/१/२०१५ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीत सर्व संबंधित प्रशासकीय विभागांना उद्योगांना देण्यात येणा-या मंजू-यांच्या संख्येत कपात करणे, मंजूरी प्रक्रियेसाठी लागणारा कालावधी कमी करणे, विविध योजनांचे विलीनीकरण करुन एकच सर्वंकष योजना राबविणे, प्रचलित कायदे, धोरणे, कार्यनियमावली, तपासणी यंत्रणा यासारख्या बाबींत बदल / सुधारणा करणे व त्यासाठी विहित कालमर्यादा ठरवून देण्याचे निर्देश मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिले आहेत.

त्यानुषंगाने प्रधान सचिव (उद्योग) सातत्याने विविध प्रशासकीय विभागांच्या वरिष्ठ अधिका-यांसमवेत बैठका घेऊन सदर प्रकरणी शासन स्तरावरुन करावयाच्या कार्यवाहीबाबत ठोस व जलद निर्णय घेण्यासाठी पाठपुरावा करत अाहेत.

(३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे औद्योगिक क्षेत्रात उद्योग उभारण्यासाठी लागणा-या परवानग्यांची संख्या १४ वरुन ५ करण्यासंदर्भात कालबध्द कार्यक्रम आखून परवानग्या एकत्रित करणे व काही अनावश्यक परवानग्या रद्द करणे ही कार्यवाही सुरु केलेली आहे.

(४) अति विशाल प्रकल्प व परकीय गुंतवणूक आणणारे उद्योगांना भूखंड वाटपामध्ये प्राधान्य देऊन औद्योगिक क्षेत्र व भूखंड निवडीपासून ते भूखंडाचा ताबा देईपर्यंत महामंडळाच्या भू विभागामार्फत व मार्केटींग विभागामार्फत समन्वय साधून प्रत्येक टप्प्याबाबत मार्गदर्शन व सहाय्य करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्याच्या तिजोरीत निधीची कमतरता असताना सरकारने जाहिरातीसाठी निधी मंजूर केल्याबाबत**

**(३२) ९९१३ (०७-०४-२०१५). श्री. सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या तिजोरीत निधीची कमतरता असताना सरकारने आपल्या जाहिरातीसाठी १६ कोटी ७३ लाख रुपये मंजूर केल्याचे माहे जाने. २०१५ च्या सुमारास उजेडात आले खरे आहे काय ?

(२) असल्यास, ठोस योजना नसतानाही जाहिरातींचा अटटाहास करणा-यांची चौकशी करण्यात आली काय ?

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

(४) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०५-२०१५) :**(१) व (२) हे अंशतः खरे आहे.

शासन राबवित असलेल्या कल्याणकारी योजनांची व ध्येय धोरणांची माहिती समाजातील सर्व स्तरातील जनतेपर्यंत प्रभाविपणे पोहोचविण्यासाठी जाहिरात व हद्द प्रसिध्दी माध्यमांद्वारे नियमितपणे प्रसिध्दी केली जाते. त्याअनुषंगाने राज्यामध्यि विविध ठिकाणी जाहिरातफलक उभारण्यासाठी, सन २०४४-१५ या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये रु.१६.७३ कोटी (रुपये सोळा कोटी त्र्याहत्तर लक्ष फक्त) इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली होती. यापैकी रु.१२,८८,९५,०००/- (रुपये १२ कोटी अठ्यांशी लक्ष पंचान्नव हजार फक्त) इतकी रक्कम वितरीत केली आहे.

शासकीय योजनांची जाहिरात व प्रसिध्दी हे नियमित काम आहे. त्यामुळे या प्रकरणी चौक्शीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई-ठाणे येथील संजय गांधी राष्टीय उद्यान क्षेत्रामध्ये असलेल्या झोपड्यांचे पुनर्वसन**

**(३३) ९९१७ (०७-०४-२०१५). श्री. सुनिल राऊत (विक्रोळी), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री. दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वने विभागाच्या कार्यक्षेत्रातील ठाणे, दहिसर, बोरीवली, कांदिवली, मालाड व मुलुंड येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान क्षेत्रामध्ये असलेल्या झोपड्यांचे पुनर्वसन करण्याच्या हालचाली वनविभागाने सुरु केल्या आहेत, त्यासाठी २००० साली ज्या झोपडीधारकांनी पुनर्वसनासाठी ७ हजार रुपये भरले आहेत, त्याचीच यादी तयार करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. मात्र वन जमिनीवर झोपडया नाहीत म्हणून हद्दीचा वाद असल्यामुळे बहुतांश रहिवाशांना पुनर्वसनाचे पैसे भरता आले नाही, १९९७ च्या निर्णयानुसार संयुक्त सर्वेक्षणाचे आदेश असताना ते आतापर्यंत सेर्वक्षण झालेलेच नाही, शासनाने २००० पर्यंतच्या झाेपड्यांना सरंक्षण देणारा आदेश येथील झोपड्यांना लागू नसल्याची धक्कादायक बाब माहे जानेवारी, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील रहिवाशांवर अन्याय होवू नये यासाठी सन २००० पर्यंतच्या झोपड्यांना सरंक्षण देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात येत नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५) :**(१) हे खरे नाही.

सन २००८ मध्ये १९९५ पुर्वीच्या १६६५१ अतिक्रमकांकडून मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार रक्कम रु.७०००/- स्विकारण्यात आली आहे.

१९९७ च्या निर्णयानुसार संयुक्त सर्वेक्षणाचे आदेश असताना ते आतापर्यंत सर्वेक्षण झालेलेच नाही, हे खरे नाही.

महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ नुसार ज्या वस्त्या गलिच्छ वस्त्या म्हणून घोषीत करण्यात आल्या आहेत. अशा गलिच्छ वस्त्यांतील सन २००० पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षित करण्यात आले आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील कोणतीही अतिक्रमित वस्ती गलिच्छ वस्ती म्हणून घोषीत करण्यात आलेली नसल्याने शासनाने २००० पर्यंतच्या झोपड्यांना देणारा आदेश येथील झोपड्यांना लागू नाही हे मात्र खरे आहे.

(२) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वनजमिनीवरील झोपड्यांची पात्रता निश्चित करण्यासाठी मा.उच्च न्यायालयाने दि.१०/१/२००८ च्या आदेशानुसार १.१.१९९५ ही Cutoff date निश्चित करण्यात आली आहे. मा.उच्च न्यायालयाच्या परवानगीशिवाय संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वनजमिनीवरील सन २००० पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण देता येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उस्मानाबाद जिल्ह्यातील घरगुती वीज मीटर रिडींगचा ठेका अक्षदा इलेक्ट्रीकल सिव्हील कॉम्प्यूटर, बुलढाणा या एजन्सीस दिल्याबाबत

**(३४) ९९५० (०४-०४-२०१५). श्री. ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील घरगुती वीज मीटर रिडींगचा ठेका अक्षदा इलेक्ट्रीकल सिव्हील कॉम्प्यूटर, बुलढाणा या एजन्सीला देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठेका देताना कायदेशीर बाबींची पुर्तता किंवा पडताळणी करण्यात आले नसल्याबाबत अनेक तक्रारी आले आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी जबादार असणा-या संबंधितांवर कायदेशीर कारवाई होणेबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी अधिक्षक अभियंता, म.रा.वि.वि. उस्मानाबाद यांना दिनांक २८ जानेवारी, २०१५ रोजी लेखी निवेदनाद्वारे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने संबंधितानवर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची सर्वसाधरण कारणे काय आहेत

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०५-२०१५) :**(१) होय.
(२) दोन तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.
(३) दिनांक २०.०१.२०१५ रोजीच्या पत्रान्वये मा.श्री.ज्ञानराज चौगुले, आमदार यांनी मे.अक्षदा इलेक्ट्रीकल सिव्हील कॉम्प्युटर, बुलढाणा यांना देण्यात आलेल्या निविदा ओदशासंबंधी माहिती मागितली होती व ती त्यांना १३.०३.२०१५ पत्रान्वये देण्यात आल आहे. सदर काम ई-निविदा मागवून महावितरण कंपनीच्या नियमाच्या अधिन राहून देण्यात आले आहे व त्यामध्ये कसल्याही प्रकारचा गैरव्यवहार दिसून आला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### येणेगुर (ता.उमरगा, जि.उस्मानाबाद) पशुवैद्यकीय दवाखान्याची झोलेली दुरावस्था

**(३५) ९९५३ (३०-०४-२०१५). श्री. ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येणेगुर (ता.उमरगा, जि.उस्मानाबाद) येथील पशुवैद्यकीय दवाखान्याची दुरावस्था झालेल्या कारणाने परिसरातील शेतक-यांच्या पशुधनावर उपचार होण्यास गैरसोय होत असलेबाबत व सदर दवाखान्याच्या सुधारणेबाबत तात्काळ निधी मंजूर करणेबाबत उमरगा-लोहारा येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्यव्यवसाय मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २८-१०-२०१३ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे विनंती केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणतीच कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, कार्यवाही न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत व कार्यवाही कधी करण्यात येणार वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (११-०५-२०१५)** :(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लोहारा (ता.लोहारा, जि.उस्मनाबाद) येथे पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ या शासकीय संस्थेमार्फत पुरविल्या जाणाऱ्या अपूऱ्या सुविधांबाबत**

**(३६) ९९६० (३०-०४-२०१५). श्री. ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोहारा (ता.लोहारा, जि.उस्मनाबाद) येथे पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ या शासकीय संस्थेमार्फत पुरविल्या जाणा-या अपु-या सुविधांमुळे शेतक-यांची गैरसोय होत असल्यामुळे सदर ठिकाणी तालुका लघु पशू सर्व चिकित्सालय कार्यान्वीत होणेबाबत उमरगा-लोहारा येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्यव्यवसाय मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक ३०-०३-२०१२ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे विनंती केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, कार्यवाहीस होणा-या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) उक्त रुग्णालय कार्यान्वीत होण्यास किती कालावधी लागणार आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-०५-२०१५)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) नवीन तालुका लघुपशुवैद्यकीय सर्व चिकित्सालयाची स्थापना, नवीन श्रेणी-१ च्या पशुवैद्यकीय दवाखान्यांची स्थापना व श्रेणी-२ च्या पशुवैद्यकीय दावाखान्यांच्या दर्जावाढ करुन त्यांचे रुपांत श्रेणी-१ च्या पशुवैद्यकीय दवाखान्यामध्ये करण्यासाठी विविध संवर्गातील नवीन पदनिर्मितीचे प्रस्ताव सहमतीसाठी वित्त विभागाकडे सादर केले असता, सद्यस्थितीत विभागाचा प्रस्ताव मान्य करणे शक्य नाही, अशा सूचना दिलेल्या असल्याने, नवीन पद निर्मितीचे प्रस्ताव सादर करणे शक्य झालेले नाही.
(३) विलंब झालेला नही.
(४) लोहारा येथे तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालयाची स्थापना करण्यासाठी आवश्यक असलेल्या विविध संवर्गातील नवीन पद निर्मितीस वित्त विभागाची सहमती व उच्च स्तरीय सचिव समितीची मान्यता मिळाल्यानंतर ते कार्यान्वीत करणे शक्य होईल.

---

**कोंडजीगड, (ता.लोहारा, जि.उस्मानाबाद) येथील प्रस्तावीत १३२ के.व्ही. उपकेंद्र हे लोहारा तालुक्याच्या ठिकाणी स्थलांतरीत करण्याबाबत.**

**(३७) ९९६९ (३०-०४-२०१५). श्री. ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोंडजीगड, ता.लोहारा, जि.उस्मानाबाद येथील प्रस्तावीत १३२ के.व्ही. उपकेंद्र हे लोहारा या तालुक्याच्या ठिकाणी स्थलांतरीत करुन कार्यान्वीत करणेबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी मा.अध्यक्ष व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ पारेषण, प्रकाशगंगा मुंबई यांना दिनांक २४ नोव्हेबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास लेखी पत्राव्दारे विनंती केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती,

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२८-०४-२०१५) :**(१) होय,

(२) मे.सुयोग उर्जा प्रा.लि. यांचेतर्फे कोंडजीगडपासून सुमारे ८ ते १० कि.मी. अंतरावर असलेल्या कोराळा, ता.उमरगा, जि.उस्मानाबाद, येथे १२५ मे.वॅ. पवन ऊर्जा प्रकल्प उभारणे प्रस्तावित असून सदर प्रकल्पातून निर्माण होणा-या विजेचे निष्कासन कारण्यासाठी सदर कंपनीमार्फत कोराळा येथे १३२ के.व्ही. उपकेंद्र उभारण्यात येणार आहे. या उपकेंद्रातील अति उच्च दाब रोहित्रांना परिसरातील ३३ के.व्ही. उपकेंद्रे जाडण्यात येणार असल्यामुळे सदर परिसरातील कमी दाबाने होणा-या वीज पुरवठ्याची समस्या दूर होईल. यास्तव, सद्यस्थितीत १३२ के.व्ही. कोंडजीगड किंवा लोहारा उपकेंद्राची आवश्यकता नही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव तालुक्यात मार्केटिंग फेडरेशनने मका खरेदी करणेबाबत**

**(३८) १००१५ (१०-०४-२०१५). श्री. गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव तालुक्यात मार्केटिंग फेडरेशनने १ जानेवारी, २०१५ पासून मका खरेदी केंद्र सुरु केले आहे हे खरे आहे काय

(२) असल्यास, तथापी तालुक्यात गोदामे उपलब्ध नसल्याने उक्त केंद्रावर अदयाप मक्याचा एक दाणाही खरेदी करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान आठवडयात उघडकीस आले आहे हे खरे आहे काय

(३) असल्यास, तालुक्यातील मक्याची तातडीने खरेदी करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. गिरीश बापट (१६-०५-२०१५) :** (१) व (२) खरे नाही.

आधारभूत किंमत खरेदी योजना ही केंद्र शासनाची योजना आहे. आधारभूत किंमतीचा लाभ होण्याच्या दृष्टीने व शेतक-यांना हमी भावापेक्षा कमी किंमतीने (डीस्ट्रेस सेल) धान्य विकावे लागू नये म्हणून राज्य शासनातर्फे धान/भरडधान्य (एफ.ए.क्यू) खरेदी करण्यात येते.

त्यानुसार राज्य शासनाने दि.३०.१०.२०१४ रोजी आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत धान/भरडधान खरेदी करण्याबाबतचा शासननिर्णय निर्गमित केला आहे.

तथापि, केंद्र शासनाने दि.१३.१०.२०१४ च्या पत्रान्वये दिलेल्या निदेशानुसार राज्यात मक्याची खरेदी दि.१ जानेवारी, २०१५ रोजीपासून सुरु करावयाची आहे.

त्यानुसार दोन्ही अभिकर्ता संस्था तसेच सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी यांना शासनाच्या दि.२१.२०१५ च्या पत्रान्वये आवश्यक सूचना पुनःश्च देण्यात आल्या आहेत.
दि.३१.३.२०१५ अखेर जळगाव जिल्हयात सुरु झालेली खरेदी केंद्रे व झालेली भरडधान्य खरेदी पुढीलप्रमाणे आहे.

| खरेदी केंद्र | खरेदी (क्विंटल) | | |
|---|---|---|---|
| | ज्वारी | बाजरी | मका |
| १२ | १२८४८.०० | ०.०० | १५०३४.५० |

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**होट्टल (ता.देगलूर,जि. नांदेड) या पर्यटन स्थळाचा विकास करण्याबाबत.**

**(३९) १००८० (०६-०४२०१५). श्री. सुभाष साबने (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) होट्टल (ता.देगलूर,जि. नांदेड) या पर्यटन स्थळाचा विकास करण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाच्या मेगा टुरिझम सर्किट डेव्हलपमेंट या योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत किती निधी उपलब्ध झाला आहे व कोणत्या कामावर किती खर्च करण्यात आला वा येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०४-२०१५) :**(१) होय.

(२) केंद्र शासनाने केंद्र पुरस्कृत मेगा टूरिझम सर्किट योनजेअंतर्ग नांदेड जिल्हयातील सिध्देश्वर मंदिर होट्टल येथील रु.३४४,९४ लक्षची विकास कामे जूर असून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत जिल्हाधिकारी, नांदेड यांना रु.१७२.४७ लक्ष उपलब्ध करुन दिला आहे.

(३) जिल्हाधिकारी, नांदेड यांनी कार्यवाही अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांच्यामार्फत सिध्देश्वर मंदिर होट्टल येथील विकासांतर्गत टूरिस्ट फॅसिलिटी सेंटर, सेक्युरिटी केबीन, स्वच्छतागृह, परिसर सुधारणा, संरक्षण भिंत, घनकचरा व्यवस्थापन, विद्युतीकरण इ. कामांचे कार्यारंभ आदेश दिले आहेत. तथापि, मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे या मंदिरांच्या मालकी हक्काबाबत दाखल रिट पिटीशन क्र.५७८२/२०१३ मध्ये मा.न्यालयाने जैसे थे (Status-quo) आदेश दिलेले असल्यामुळे कामास सुरुवात झालेली नाही.

---

**पंढरपुरच्या विठ्ठलमंदिरांच्या गाभाऱ्यात लाकडाच्या वासा**
**विठ्ठलमुर्तीच्या मखरावर कोसळल्याबाबत**

**(४०) १००८४ (०६-०४-२०१५). श्री. महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री. चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री. बच्चू कडू (अचलपूर), डॉ. अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपुर येथील विठ्ठलमंदिरांच्या गाभाऱ्यात लाकडाच्या वासा विठ्ठलमुर्तीच्या मखरावर कोसळण्याची घटना दिनांक १३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोटयवधी भाविकांचे श्रध्दास्थान सुस्थितीत ठेवण्याकडे दुर्लक्ष करणा-या मंदिर समितीवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१५) :**(१) हे खरे नाही. तथापि, श्री विठ्ठल मंदिराच्या गाभा-यात वरच्या बाजूला जुन्या काळात बसविलेला पत्रा टिकून राहण्यासाठी बसविण्यात आलेल्या ४ लाकडी पट्ट्यांपैकी एक लाकडी पट्टी निसटून खाली पडली होती. तथापि, त्यामुळे श्री. विठ्ठल मूर्तीस व भाविकांना कोणतीही इजा झालेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील इंदिरा महिला सहकारी साखर कारखाना मर्यादित तांबाळे**
**ता. भुदरगड, जि. कोल्हापूर हा कारखाना गेल्या २ वर्षापासून बंद असल्याबाबत**

**(४१) १००९१ (०९-०४-२०१५). श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील इंदिरा महिला सहकारी साखर कारखाना मर्यादित तांबाळे ता. भुदरगड, जि. कोल्हापूर हा कारखाना गेली २ वर्षे बंद आहे हे खरे आहे काय ?

(२) असल्यास, या कारखान्याने गेली २ वर्षे कर्मचा-यांचे पगार, शेतक-यांचे उसाची बीले थकीत ठेवून शेतक-यांचे प्रचंड नुकसान केले आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, भुदरगड तालुक्यातील उस उत्पादक शेतक-यांच्या हितासाठी व शेकडो कामगारांच्या भविष्यासाठी प्रश्न मिटवण्यासाठी या कारखान्यावर ताबडतोब प्रशासन नेमून कारखाना सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०५-२०१५)** :(१) होय. खरे आहे.
(२) कारखाना सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मध्ये बंद असल्याने शेतकऱ्यांची बिले थकीत राहण्याचा प्रश्न उद्‌भवलेला नाही. तथापि दोन वर्षात कामगारांना कामावर ठेवणे शक्य झालेले नाही.
(३) विद्‌यमान संचालक मंडळाचा कालावधी नोव्हेंबर, २०१५ पर्यंत असल्याने प्रशासक नेमणे शक्य होणार नाही.
(४) साखर कारखानदारी सध्या बिकट आर्थिक परिस्थितीत असून साखरेचे भाव पडल्यामुळे/घसरल्यामुळे कारखाना चालविण्याकरीता/भाडेतत्वावर देणेकरीता प्रतिसाद मिळत नसल्यामुळे कारखाना भागीदारी अथवा भाडेतत्वावर चालविण्यास देण्यास विलंब होत आहे.

---

## कोल्हापूर जिल्ह्यातील दाजीपूर अभयारण्याचा पर्यटन विकास आराखडा तयार करुन आर्थिक निधीची तरतूद करणेबाबत

**(४२) १००९२ (०६-०४-२०१५). श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील दाजीपूर अभयारण्य हे गवारेड्यांसाठी प्रसिध्द असणारे घनदाट जंगल असून या ठिकाणी निसर्गाने मुक्त हस्ताने उधळन केलेली जैव विविधता गर्द वनराई हवेशीर व थंड अल्हाददायक वातावरण नयनरम्य पठार राऊतवाडी या धबधबा यासारखी पर्यटकांना आकर्षित करतील अशा पध्दतीची नैसर्गिक पर्यटन स्थळे उपलब्ध आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या दुर्लक्षामुळे या अभयारण्याकडे पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्यासाठी कोणतीही कार्यवाही करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भविष्यात या परिसराकडे पर्यटकांच्या ओढा वाढण्यासाठी योग्य पर्यटन विकास आराखडा करुन यासाठी विशेष बाब म्हणून आर्थिक निधीची तरतूद करणेबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५)** :(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

(३) राधानगरी अभयारण्याच्या शास्त्रोक्त व सर्वांगिण विकासाकरीता सन २०१३-१४ ते २०२२-२३ या कालावधीसाठी व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात आला असून त्यास प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी दिनांक ०१.०४.२०१४ रोजी मान्यता प्रदान केली आहे.

सदर आराखड्यामध्ये वन पर्यटन झोन निश्चित करुन त्यामध्ये करावयाच्या कामासाठी तरतूद करणेत आलेली आहे.

---

**राज्यातील संजय गांधी निराधार योजनेतून देण्यात येणारे अनुदान हे प्रती लाभार्थी ३००० रु. करण्याबाबत**

**(४३) १००९९ (१०-०४-२०१५). श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, इंदिरा गांधी वृध्द शेममजूर योजना या योजनांच्या‍ा माध्यमातून वृध्द निराधारांची सेवा करण्यासाठी शासनाचे प्रयत्न सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीमध्ये वाढती महागाई, अत्यावश्यक गरजा यांचा विचार करता संजय गांधी निराधार योजनेतून देण्यात येणारे अनुदान हे प्रती लाभार्थी ३००० रु. करण्याबाबत शासनाचा निर्णय काय आहे ?

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. राजकुमार बडोले (२८-०५-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

राज्यातील वृध्द, निराधार विधवा, परित्यक्त्या, अंध, अपंग, शारिरीक व मानसिक आजाराने रोगग्रस्त व्यक्ती, देवदासी, घटस्फोट प्रक्रियेतील व घटस्फोट झालेल्या परंतु पोटगी न मिळणा-या महिला, देवदासी, अत्याचारीता महिला, वेश्या व्यवसायातून मुक्त केलेल्या महिला, तृतीय पंथी, १८ वर्षाखाली अनाथ बालके, तुरुंगात शिक्षा भोगत असलेल्या कुटुंब प्रमुखाची पत्नी, ३५ वर्षे व त्यावरील वयाची अविवाहित स्त्री इ. प्रवर्गांना विशेष सहाय्य कार्यक्रमांतर्गत संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजना या योजनांतर्गत मासिक अर्थसहाय्य देण्यात येते.

(२) लाभार्थ्यांच्या मासिक अर्थसहाय्यात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्रातील जंगलात वाघांचे शिकारीला आळा घालण्यासाठी करावयाच्या उपाययोजना**

**(४४) १०१२१ (०७-०४-२०१५). श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), प्रा. वर्षा गायकवाड (धारावी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री. डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्याघ्रगणनेतून समोर आलेल्या सन २०१० च्या व्याघ्रगणनेच्या तुलनेत २०१४ च्या व्याघ्रगणनेत केवळ साडेबारा टक्के वाघ महाराष्ट्रात वाढले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास उजेडात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या वर्षात वाघांचे २० शिकारीचे प्रकार निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, मेळघाट, पेंच व्याघ्र प्रकल्पांसह उमरेड-हांडला, बोर अभयारण्ये या कडे शिका-यांनी लक्ष केद्रीत केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वाघांच्या शिकारीवर आळा बसविण्यासाठी राज्यशासनाला अपयश येत असल्याने राज्यशासनाने वाघांच्या संख्येत वाढ होण्यासाठी व वाघांच्या शिकारीला आळा बसण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अदयाप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५) :**(१) होय हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

गेल्या वर्षी सन २०१४ मध्ये वाघाच्या शिकारीची एकही घटना निदर्शनास आलेली नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) वाघांच्या संख्येत वाढ होण्यासाठी व वाघांच्या शिकारीला आळा बसविण्यासाठी खालील प्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- मेळघाट, जवेगाव-नागझिरा, पेंच आणि ताडोबा, व्याघ्र प्रकल्पांकरीता प्रत्येकी ११२ अधिकारी/कर्मचारी असणारी ४ विशेष व्याघ्र संरक्षण पथके स्थापन करण्यात आली आहेत.
- मानव-वन्यप्राणी संघर्ष कमी करण्याच्या दृष्टीने संरक्षित क्षेत्रातील गावांचे स्वेच्छेने पुनर्वसन करण्यात येत आहे.
- संरक्षित क्षेत्रात वन्यजीव अधिवास विकासाची कामे घेतली जातात.
- वन्यजीव विभागाअंतर्गत येणा-या सर्व अभयारण्य व राष्ट्रीय उद्यान क्षेत्रात वाघाच्या शिकारीला आळा बसविण्यासाठी तसेच वन्यजीवांच्या सुरक्षेसाठी विशेष अभियानाअंतर्गत वन व वन्याजीवांचे संरक्षणाकरीता वनकर्मचा-यांना वनसंरक्षणाकरिता वाहने पुरविण्यात आली आहेत.
- त्याचप्रमाणे पिस्तुल, एस.एल.आर. रायफल अशी शस्त्रेसुध्दा पुरविण्यात आली आहे.
- वनकर्मचा-यामार्फत वन्यजीव क्षेत्रात नियमित गस्त घालण्यात येते संपुर्ण क्षेत्रात संरक्षण कुटी उभारण्यात आल्या आहेत.

- २४ तास कर्मचारी तैनात असतात.
- नियमित वाहन तपासणी करण्यात येते.
- नियत क्षेत्राची नियमितपणे अधिकाऱ्यांकडून तपासणी करण्यात येते.
- वनसंरक्षणाकरता लोकांचा सहभाग वाढविणेकरीता ग्रामपरिसर विकास योजना स्थापन करण्यात आल्या आहेत.
- गुप्त माहिती पुरविण्याबाबत खब-यांला बक्षीस देण्यासाठी गुप्त सेवा निधीची तरतूद करण्यात आली आहे.
- त्याच प्रमाणे शिकारीवर प्रतिबंध घालण्याकरिता स्वतंत्र वन्यजीव कक्षाची स्थापना करुन सायबर डाटा ॲनालेसीस करणे सीआयबी संस्थेची मदत घेणे इत्यादी उपययोजना करण्यात आलेल्या आहेत.

---

**राज्यातील ० ते १८ वर्षे वयोगटातील मुलांच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी आराखडा तयार करून बालधोरण तयार करण्याबाबत**

**(४५) १०१२२ (०७-०४-२०१५). श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री. विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ० ते १८ वर्षे वयोगटातील मुलांच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी आराखडा तयार करून बालधोरण तयार करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने तयार करण्यात आलेल्या बालधोरणाची अंमलबजावणी केली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आले हे खरे आहे काय,

(३) असल्यास, बालधोरणाची लवकरात लवकर अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२८-०५-२०१५) :**(१) होय.

(२) नाही.

(३) बाल धोरण जाहिर करण्यात आले असून याबाबतचा शासन निर्णय दिनांक ४.३.२०१४ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कामगारांच्या हितासाठी कामगार कल्याणाबाबत**

**(४६) १०१४२ (०६-०४-२०१५). श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कामगारांच्या हितासाठी कामगार कल्याण विभागाच्या मार्फत शासनाच्यावतीने विविध सहाय्यकारी योजनांसाठी कोट्यावधी रुपये खर्च केले जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या योजना राबवताना कोल्हापूर जिल्ह्यामध्ये बोगस कामगारांची नोंदणी करुन शासनाचे कोट्यावधी रुपये चूकीच्या पध्दतीने लाटण्याचे काम कामगार आयुक्त, कोल्हापूर यांनी केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत स्वतंत्र चौकशी नेमून शासनाची लूबाडणूक व फसवणूक करणाऱ्या अधिकारी व संबंधितांवर फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (२९-०५-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या अनेक आर्थिक लाभांच्या योजना आहेत.
(२) हे खरे नाही. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळात , कामगार कल्याण निधी भरणाऱ्या कामगारांची नोंदणी केली जाते. त्याकरिता कोल्हापूर येथे कमागार कल्याण अधिकारी हे गट प्रमुख म्हणून काम करतात. या जिल्ह्यात मंडळाचे कामगार आयुक्त हे पद नाही.
(३) प्रश्नच उद्भवत नाही.
(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**राज्यातील शिधावाटप दुकानांवर बायोमॅट्रिक पध्दतीने धान्य वाटप करण्याबाबत तसेच शिधापत्रिकेला आधार क्रमांक जोडण्याच्या निर्णयाबाबत**

**(४७) १०१५२ (०७-०४-२०१५). श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री. धनजंय (सुधीर हरी) गाडगीळ (सांगली), श्री. भारत भालके (पंढरपूर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री. दिपक चव्हाण (फलटण), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ. बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री. मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ५२ हजार २३२ रेशन दुकानांवर बायोमॅट्रिक पध्दतीने धान्य देण्याची योजना अंमलात आणण्याचे विचाराधीन असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले व बनावट शिधापत्रिकांना आळा बसण्याकरिता लाभार्थ्यांचे आधार क्रमांक (युआयडी नंबर) शिधापत्रिकेला जोडण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच मंगळवेढा व पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील शिधावाटप दुकानांमध्ये संगणीकृत बायोमॅट्रीक प्रणाली सुरु करावी अशी मागणी लोकप्रतिनिधी,सोलापूर शहर (मध्य) यांनी शासनाकडे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच सांगली, रायगड व औरंगाबाद जिल्ह्यातील काही तालुक्यामध्ये शिधावाटप दुकानदारांना प्रशिक्षण न देता बायोमॅट्रीक यंत्रणा सुरु केली आहे आणि आधार कार्ड व बँक खाते नसलेल्या ग्राहकांना धान्य वाटप केले जात नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१), (२) व (३) बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१४-०५-२०१५) :** (१) राज्य शासनाने बारकोडेड संगणकीकृत शिधापत्रिका कुटुंबातील वरिष्ठ महिलेच्या नावे व फोटोसह तसेच कुटुंबातील सर्व लाभार्थ्यांच्या आधार क्रमांकाच्या समावेशासह देण्याचा व रास्तभाव दुकानातून शिधावस्तूचे वितरण लाभार्थ्यांची बायोमेट्रिक ओळख पटवून करण्याचा निर्णय घेतला आहे.
(२) नाही. असे पत्र प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले नाही.
(३) नाही. सांगली व औरंगाबाद जिल्हयांमध्ये प्रायोगिक स्तरावर बायोमेट्रिक यंत्रणा जिल्हास्तरावरील जिल्हा नियोजन समितीच्या निर्णयाद्वारे सुरु करण्यात आली असून संबंधित रास्तभाव धान्य दुकानदार यांना बायोमेट्रिक प्रणालीद्वारे धान्य वितरण करणेचे योग्य प्रशिक्षण देण्यात आले आहे. रायगड जिल्हयामध्ये बायोमेट्रिक प्रणालीद्वारे धान्य वाटप सुरु नाही. सांगली व औरंगाबाद या जिल्हयांमध्ये मंजूर नियतनानुसार रास्तभाव दुकानदारांमार्फत आधारकार्ड व बँक खाते नसलेल्या ग्राहकांना देखील धान्य वितरीत केले जात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आरोपी विरुध्दचे गुन्हे सिध्द होण्याचा कनव्हिक्शन दर वाढविण्याबाबत**

**(४८) १०१५६ (०७-०४-२०१५). श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)राज्यात अपराध सिध्दता म्हणजे फौजदारी खटल्यामधील आरोपी विरुध्दतेचे गुन्हे सिध्द होण्याचा कनव्हिक्शन दर देशातील इतर राज्याच्या तुलनेत राज्यात फारच कमी असल्याने तो वेगाने वाढविण्यासंदर्भात शासनाने प्रस्ताव तयार केला असल्याचे दिनांक १९ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०५-२०१५) :**(१) व (२) फौजदारी खटल्यातील दोषसिध्दतीचे प्रमाण वाढविण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीने शासनास सादर केलेल्या अहवालावर पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मलकापूर (ता.जि.अकोला) ग्रामपंचायतीसाठी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतून पाणी आरक्षित करण्याबाबत**

**(४९) १०१८० (०७-०४-२०१५). श्री. गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री. राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (ता.जि.अकोला) ग्रामपंचायतीसाठी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतून पाणी आरक्षित करावे अन्यथा आमरण उपोषण करण्याचा इशारा मलकापूर ग्रामपंचायतीचे सरपंचानी जिल्हाधिका-यांना माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिलेल्या निवेदनात दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१३-०५-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) मा.जिल्हाधिकारी, अकोला यांनी दिनांक २८ जानेवारी, २०१५ रोजी मलकापूर पाणी पुरवठा योजना ता.जि.अकोलाकरिता कुंभारी तलावामधून ०.२१३ द.ल.घ.मी. पाणी आरक्षण करण्याकरिता पाटबंधारे विभाग, अकोला यांना निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता, अकोला पाटबंधारे विभाग, अकोला यांनी दिनांक ०२.०२.२०१५ रोजी कुंभारी लघु प्रकल्पामधून ०.२१३ द.ल.घ.मी. पाणी आरक्षण मंजुरी दिनांक ३० जून, २०१५ पर्यंत दिली असून ग्रामपंचायत मलकापूर यांना कुंभारी लघु प्रकल्पामधून ०.२१३ द.ल.घ.मी. पाणी उचलण्याची परवानगी देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला जिल्हयातील कृषी विद्यापीठातील नोकर भरतीतील परीक्षा प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याबाबत**

**(५०) १०१८१ (०४-०४-२०१५). श्री. गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री. राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील कृषी विद्यापीठातील नोकर भरतीतील परीक्षा प्रक्रिया ऑक्टोबर, २०१४ पर्यंतची राबविण्याची क्रमप्राप्त असलेली प्रक्रिया धिम्या गतीने सुरू असून या प्रक्रियेला ७ महिने उलटले असले तरीही अद्यापही ही भरती प्रिक्रया अपूर्णच असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दुस-या आठवडयात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी मंत्र्यांसमवेत झालेल्या बैठकीत ही भरती प्रक्रिया दिनांक ३१ जानेवारी, २०१५ पर्यंत पूर्ण करण्याचे आश्वासन कुलगुरूंनी दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आश्वासनानंतरही भरती प्रक्रिया पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत,

(४) उक्त भरती प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०५-२०१५) :**(१) अंशतः खरे आहे.

(२) होय.

(३) डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील वरिष्ठ संशोधन सहाय्यकांची भरती प्रक्रिया पूर्ण झालेली असून कनिष्ठ संशोधन सहाय्यकांची भरती प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.